Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# *दलित जाणिवेचा कलात्म आविष्कार : पारंब्या*

*सिद्धार्थ आगळे*

**_प्रस्तावना :–_**

साठोत्तरी दलित काव्याच्या प्रवाहात कुमार अनिल यांच्या 'पारंब्या' या काव्यसंग्रहाचे स्थान लक्षणीय स्वरूपाचे आहे. फुले–आंबेडकरी जाणिवांचा अत्यंत संयत व कलापूर्ण आविष्कार हे या संग्रहाचे वैशिश्ट्या तसेच बलस्थानही आहे. अडतीस कवितांचा समावेश असलेल्या या संग्रहात सर्वत्र पारंब्यांची एक प्रधान प्रतिमा केंद्रस्थानी असून या प्रधान प्रतिमेच्या अनुशंगानेच कवीच्या व्यामिश्र भावानुभवांची मांडणी झालेली असल्यामुळे वाचकांसमोर एक रेखीव व एकसंघ असे काव्यशिल्प साकार होत राहाते. आविष्कृत होणारा भावानुभव कोणत्याही जातीचा असो, कवी प्रारंभापासून अखेरपर्यंत पारंब्यांच्या प्रतिमेच्या भाशेतूनच बोलत राहतो.

भारतीय समाजव्यवस्थेतला एक उपेक्षित घटक म्हणून, वेगेवेगळ्याा अनुभवांचे गाठोडे पाठीशी घेऊन जीवनात वावरत असताना अशाच कुठल्याशा एका क्षणी आपले वंचितावस्थेतले जीवन व वडाच्या पारंब्याची विविध रूपे यात कमालीचे साधर्म्य असल्याची प्रतीती कवीला होते. प्रतीतीच्या या क्षणी कवीला आपल्या जीवनानुभवांना कलात्मक रूप देणारा एक समुचित 'फॉर्म'च पारंब्याच्या रूपाने गवसतो. आपल्या उपेक्षित जीवनातल्या विविध अवस्था व पारंब्यांची विविध रूपे यात अद्वैत असल्याचा प्रत्यय कवीला येतो. अद्वैताच्या या प्रतीतीने कवीचे अवघे भावविश्वच पारंबीमय होऊन जाते. पारंब्यांच्या या प्रतिमेच्या रूपाने वेगवेगळ्याा जीवनानुभवांना, त्यांच्यातील आंतरविरोधांना सामावून घेऊन त्यांना एकसंध करणारे आशयसूत्रच कवीला उपलब्ध होते. या आशयसूत्रामुळे अनेकतेत एकता असल्याचा अनुभव कवीला येतो.

पारंब्या ज्या वटवृक्षाचा अविभाज्य भाग असतात तो वटवृक्षही मुळी अनेकतेतील प्रतीक मानला गेला आहे, ही बाबही उल्लेखनीय ठरते. विनोबा भावे एके ठिकाणी म्हणतात, ''हिंदूस्थानात अनेक धर्म, अनेक जाती, अनेक भाशा, अनेक पंथ भरलेले आहेत. लोक विचारतात, हा काय गोंधळ आहे?मी म्हणतो हा गोंधळ नव्हे. हे वडाचे झाड आहे! (ज्ञानगंगा–सं. के. मा. नाईक, पृ. 191) भारतीय संस्कृतीतील अनेकतेतील एकतेचे प्रतीक म्हणूनच विनोबा येथे वडाच्या झाडाकडे पाहत आहेत. पारंब्यांच्या प्रतिमेमुळेही कुमार अनिलांच्या ह्या काव्यात अनेकतेतील एकतेचाच आपल्याला प्रत्यय येतो.

पारंब्यांच्या ह्या प्रतिमेमुळे आविश्काराला एकसूत्रता लाभून कलात्मकता प्राप्त झाली हे खरे, तसेच या प्रतिमेमुळेच सभोवतालच्या वास्तवाचे सम्यक व वस्तुनिष्ठ असे आकलन कवीला करता आले. एकांगीपणा आणि वृथा अभिनिवेशापासून कवी अलिप्त राहू शकला, कारण पारंब्यांचीच भूमिका साक्षीदाराची, तटस्थ निरीक्षकाचीच असू शकते. कवी हाही एक पारंबीच आहे. पारंब्यांचीच भूमिका स्वीकारल्यामुळे कवीला दलित–शोशित समाजातील विविध वृत्ती–प्रवृत्तींचा, त्यांच्या यशापयशाचा व एकूणच दलित चळवळीतील उत्पत्ती–स्थिती–लयाच्या अवस्थांचा वस्तुनिश्ठ कलात्मक आलेख रेखाटता आला आहे. या आविश्कारात बटबटीतपणाचा अभाव असून व्यामिश्र अनुभवांच्या मुशीतून अवतरणारी प्रतिमांकीत शब्दकळा कमालीची प्रत्ययोत्पादक आहे. अनुभव आणि आविश्कारातले अद्वैत या काव्यसंग्रहात पाहायला मिळते.

वडाच्या झाडाला भारतीय संस्कृतीत धार्मिक पावित्र्य लाभलेले आहे. सत्यवान–सावित्रीची मिथ या वडाशीच निगडीत आहे. आजही वटसावित्रीची पूजा केली जाते. वटपौर्णिमा धार्मिक भावनेने पाळली जाते. पंचवटी हे आणखी एक श्रद्धास्थान. विनोबा तर आपल्या देशाचे समर्पक प्रतीक म्हणूनच वडाकडे पाहतात. कवीही विनोबांप्रमाणेच भारतीय समाजव्यवस्थेचे प्रतीक म्हणूनच वडाकडे पाहतो हे खरे. पण विनोबांनी वडाची उपमा देताना भारतीय समाजव्यवस्थेचे जे उदात्तीकरण केले आहे ते कवीला मान्य होणे फार अवघड आहे. आपल्या समाजात जी अनेकतेत एकता दिसते ती वस्तूतः मृगजळाप्रमाणे आहे, भोंगळ आहे. या संग्रहातील एका कवितेत वडाच्या आश्रयाला आलेल्या एका म्हाताऱ्याने जो प्रश्न

**Please cite this Article as :*सिद्धार्थ आगळे, दलित जाणिवेचा कलात्म आविष्कार : पारंब्या*: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

स्वतःशी विचारलेला आहे तो या संदर्भात बरेच काही सांगून जाणारा आहे. ''केवडा मोटा वड पर ह्या पानांना गणगोत हाय का?''(37) असा तो प्रश्न आहे. येथल्या शेकडो जाती–जमाती, त्यांच्यात खदखदणारा असंतोष, जन्माधारित समाजव्यवस्थेतील विषमता, शोषणाच्या विविध संस्था... इ. इ. हे सगळे लक्षात घेतले म्हणजे येथल्या अनेकतेतील एकत्वाचा फोलपणा लक्षात येतो. म्हणूनच कोणतेही ग्लोरीफिकेशन न करता कवी वडाकडे वस्तुनिश्ठ दृष्टीतून बघतो. परंपरेने पावित्र्य लाभलेला हा वड कवीला दिसतो, तर चक्क ऱ्हासोन्मुख रूपात ! खंगणारा, झडणारा, वाळणारा... (31), मोकडकळीस आलेला (32), अखेरचा (24), पानं पुरती गळालेला, नागवं शरीर झाकण्यासाठी रडणारा (32), मावळायला लागलेला (33), उन्मळलेला, संपलेला (34), पानं झडलेला, वारूळ लागलेला (43). या ऱ्हासोन्मुख रूपातले बहुतेक वड स्मशानातले आहेत ही बाबही उल्लेखनीय आहे.

परंपरेने फार मोठे पावित्र्य लाभलेला हा वड आता रोगजर्जर होऊन ऱ्हासाच्या पंथाला कसा लागला?महाकाय रूपातला हा महावृक्ष आता मोडकळीस का आला आहे? तर ही अवस्था या वडाने स्वतःहूनच आपल्यावर ओढून घेतली आहे. पारंब्या या वडाचा आधार होत. स्वतःला आधार मिळावा म्हणून त्याने त्या निर्माण केल्या आहेत. अपत्याचे हित बघणे हे जन्मदात्याचे कर्तव्यच ठरते. पण जन्मदात्यानेच आपल्या अपत्यांना शोषणाच्या, पारतंत्र्याच्या खाईत लोटले तर त्यात अपत्यांबरोबर जन्मदात्याची अधोगतीही निश्चित होते. पारंब्या जशा वडाची अपत्ये होत तसाच अस्पृश्य समाजही भारतीय समाजव्यवस्थेचाच एक अविभाज्य घटक आहे. पण इथल्या समाजव्यवस्थेने त्याला सापत्नभावाची, अवांच्छित अपत्यांचीच वागणूक दिली. परिणामी इथल्या मोठ्याा मानव समूहाच्या नशिबी सर्वंकश शोषणाचाच भोगवटा वाट्याला आला. 'पारंब्या' या संग्रहातील संख्येने सर्वाधिक असलेल्या पारंब्या या शोषित रूपातल्याच आहेत. या शोषित पारंब्या कवीला कशा दिसतात?तर उपऱ्या, फांदीवर लटकलेल्या, मुक्या, दबलेल्या (18), खोकणाऱ्या (25) सावलीतून डोकावताना जमिनीवरच्या मुर्दाड दगडांना डोळे मारत आपल्या स्तनांचं प्रदर्शन भरवणाऱ्या, पोटाच्या आगीसाठी देहाचा बाजार बसवून वासनेच्या आगीत ढणाढणा जळणाऱ्या कुंटणखान्यातल्या (28), अमावस्येच्या रात्री रक्ताळल्या जाणाऱ्या (29), अंगावर पुवाचे गट्ठे, चाबकाचे वळ अन् सुजलेलं मायअंग अशा रूपातल्या फांदीवर टांगलेल्या, उघड्याा–नागड्याा पारंब्या (30), सोलपटलेल्या चमड्याखाली लालभडक देह असणाऱ्या, वासनेच्या आगीत होरपळून पाण्यासाठी धावणाऱ्या, अधांतरी टांगलेल्या (32), लोंबत्या (34), वठलेल्या (35), चिखलात रूतलेल्या (43), रडणाऱ्या (47), चुलीचं सरपण म्हणून उपयोगात येणाऱ्या (47).

शोषित पारंब्यांची ही अवस्थाच वडाच्या ऱ्हासाचे एक प्रमुख कारण आहे. या उपऱ्या लोंबत्या, खंगणाऱ्या, वाळणाऱ्या, रडणाऱ्या, चिखलात रुतलेल्या, उघड्याा, बलात्कारीत पारंब्या इथल्या शोषितांच्या शापित विश्वाचे मनाला खिन्न करणारे दर्शन घडवतात. दलित शोषितांचा वर्ग इथल्या समाजव्यवस्थेचा अविभाज्य भाग असूनही या वर्गाची अवस्था मात्र अधांतरी लोंबणाऱ्या पारंब्यांसारखीच आहे, हा वर्ग येथे तसा उपराच आहे, हे कटू वास्तव या शोषित पारंब्यांच्या चित्रणातून कवी आपल्याला सांगून जातो. कसायाने कापून ठेवलेल्या पशूचे टांगलेल्या अवस्थेतले धड ज्याप्रमाणे दिसावे तशा लोंबत्या रूपातल्या या पारंब्या संवेदनशील मनाला अंतर्मुख करतात. फुले–आंबेडकरी प्रेरणा उरात जपणाऱ्या या कवीने ''सावलीत गुरफटलेल्या मुक्या पारंब्यांना'' आपला काव्यसंग्रह अर्पण केलेला आहे, ही बाब लक्षणीय आहे.

या संग्रहातील बहुतांशी पारंब्या मूक, शोषित, दबलेल्या असल्या, अन्याय साहणाऱ्या असल्या तरी हा अन्याय साहण्याचीही एक विशिष्ट सीमा असते. या सीमेपलीकडे हा अन्याय वा शोषण गेले की विद्रोहाचा प्रारंभ अटळ असतो. विद्रोह आभाळातून खाली पडत नसून प्रस्थापित समाजव्यवस्थेतूनच प्रतिक्रिया म्हणून तो जन्माला येत असतो. अन्याय, शोषण या विरूद्धच्या संघर्शाची सुरुवात या विद्रोहातून होत असते. विद्रोहापूर्वी गुलामाला गुलामीची जाणीव होणे आवश्यक असते. शोशित समाजातील जागृतीचा विद्रोह हा प्रारंभिक पण अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. शोषित पारंब्यांच्या विश्वातील विद्रोहाचे मोठे प्रत्ययकारी वर्णन येथे कवी करताना दिसतो.

शोषण असह्य झाले की मग 'पारंब्यांच्या मनात पाणी उकळू लागतं. (28), त्या वेदना झुगारू लागतात (41), विद्रोहाची भाषा बोलू लागतात (14). याहीपुढे जाऊन त्या रक्ताळेपर्यंत कपारीला धडका देवू लागतात (42). अर्थातच विद्रोहाचा प्रवास हा सुखासुखी होत नसतो. विरोध–अवरोधाचे अनेक टप्पे त्याला ओलांडावे लागतात. कवीने याचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे. 'पारंब्या पेटून उठल्या की पिंपळावरचा खैस नाचतो, जुन्या पुराण्या ढपल्या गळून पडतात, पेटून उठतात, मनं वडाखालच्या हेड्याांची जिभल्या काढून धावतात. साप अन् यमही थरकतो वडाजवळ यायला (44), शोशितांच्या विद्रोहाला चिरडून टाकण्याची प्रस्थापितांची ताकद फार मोठी असते. या व्यवस्थेचे राखणदार असणारे खैस, हेड्याा आणि साप यांच्या नंगानाचापूढे यमाच्या रूपातली न्याययंत्रणाही लुळीपांगळी बनते. रक्ताळलेल्या पावलांकडे पाहून घुमू लागलेली घुबडं आणि माना डोलावणारी गिधाडं (27) कवीपुढे प्रश्चचिन्ह निर्माण करतात खरी! पण कवीला प्रस्थापितांच्या या नंगानाचाची खरी भीती वाटत नाही. त्याला खरी भीती वाटते ती स्वकीयांमधल्या विद्रोहाच्या गारद्यांची. 'स्मशानात भूतच भूताला दात लावतं (24), याची कवीला जाणीव आहे. यासंदर्भात 'शंढांच्या जगात पारंब्यांचा गाववसवा धंदा' (44) कवीला अस्वस्थ करतो. काही नागव्या पारंब्या तर पारंब्यांचाच फास बनत असल्याचे दृश्य कवीला दिसते. (46) 'भूकेलेली माणसं जेव्हा भाकरीसाठी तडफडतात तेव्हा वडाच्या पारंब्या वाऱ्याशी झोके घेताना' कवीला दिसतात (36). पारंब्यांची निश्क्रियता आणि भेकडवृत्ती एवढी वाढते की 'सोन्या म्हाराला धुरी दिली तरीही पारंब्या गप्पच' बसून असल्याचे दृश्य कवीला बघावे लागते (45). 'पारंब्या पारंब्यांजवळ जातील का?' याची घोर चिंता कवीला आता पडली आहे (30). विद्रोहाच्या चळवळीत सोबत करण्याऐवजी स्वीकृत मूल्यांशीच प्रतारणा करणाऱ्या पारंब्यांच्या या प्रवृत्तीमुळे कवी एवढा उद्विग्न होतो की तो आपले पारंबीपणच नाकारण्याच्या मनःस्थितीत येतो' 'मी एक पारंबी... नाही मी पारंबी नाही' (45) आपले पारंबीपण नाकारणे, पारंब्यांशी असलेलं नातं तोडणे ही कवीच्या दृश्टीने तशी दुःखद बाब आहे. 'मी माझ्या पारंबीसाठी स्मशानाला बाजू देताना दोन हुंदके' असे कवी याबाबत म्हणताना दिसतो.

विद्रोहाच्या चळवळीतील ही निराशाजनक तमोवस्था कालांतराने कवीला बदलताना दिसते. 'अधांतरी गावाबाहेर परस्परांशी नातं शोधत धावणाऱ्या पारंब्या' (31) कवीला अस्वस्थ करतात. त्यातच विद्रोहाचे प्रस्थापितातले विरोधकही त्याला नेस्तनाबूत झालेले दिसतात. 'गावाबाहेरचा स्मशानातला वड आताच संपला, आता दूर क्षितिजापर्यंत मोकळे रान' (34) असा आनंदोद्गार कवीच्या मुखातून बाहेर पडतो. विद्रोहाचे उद्दिश्ट असलेल्या नव्या शोशणमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी पारंब्यांनी परस्परांतील नात्याचा शोध घेत स्वतःच वड बनण्याचे जे स्वप्न कवीने उराशी बाळगलेले असते ते साकार होण्याची प्रासादचिन्हे आता कवीच्या दृश्टिपथात येऊ लागतात. या दृश्टीने विद्रोही पारंब्याच्या विश्वातील नव्या घडामोडी न्याहाळताना त्याला असे दिसते की, 'पारंब्यांनी पारंब्यांना नातं सांगायचं चाललंय. पारंब्यागाठी मारताहेत पारंब्यांना. पारंब्या पारंब्यांच्या डोळ्याात पाहात घरटं विणायचं चाललंय. पारंब्या आधार आहेत. वडाच्या झंझावातात पारंब्या पारंब्यांना मिठ्याा मारत... पारंब्या मूळ बनून वड बनणार आहेत.' (41).

पूर्वी या पारंब्यांनी खोड बनण्याची आशा धरली होती. पण मोडकळीस आलेला वड बघून त्या भेदरल्या होत्या. भेदरून धावत सुटल्या होत्या (17). पण आता मात्र आपल्या पारंबीपणाचाच लोप करून स्वतःचा वडात कायाकल्प करणे हाच झंझावातात टिकून राहण्याचा एकमेव पर्याय उरला असल्याची आत्मजाणीव या पारंब्यांना झाली आहे. पारंब्यांनी वडाचे रूप धारण केल्याशिवाय सर्वंकश शोशणमुक्ती शक्य नाही, असा एकंदर कवीचा अभिप्राय आहे.

अर्थात, शोशणमुक्तीचा लढा मूलभूत गरजांच्या पूर्तीपुरता, भाकरीच्या प्राप्तीपुरता मर्यादित असणे कवीला मान्य नाही. आत्मप्रतिष्ठा, स्वप्रस्थापनेच्या प्रेरणेला पूरक, पोषक ठरेल असे वातावरण, माणसाच्या निर्मितीशीलतेला प्रेरक ठरणारी व्यवस्था या गोष्टी कवीला सर्वाधिक महत्त्वाच्या वाटतात. त्यातच मानव्याची, श्रेयसाची वसती असते असे त्याला वाटते. आत्मप्रतिश्ठेच्या, स्वप्रस्थापनाच्या आणि निर्मिती स्वातंत्र्याच्या आड येणारी व्यवस्था कवीला साता जन्माची दावेदार वाटते. सृजनशीलतेतच जीवनाची सार्थकता मानणारा हा कवी आपल्या काव्यनिर्मितीला हसणाऱ्या पारंब्यांना उद्देशून तळमळीने म्हणतो, 'माझ्या देहावरच्या फांद्यांना लटकलेल्या तुम्ही, मला शाप देवू नका. तुम्हीही कविता करा, जगा पारंब्यांनो.' (15) आत्मप्रतिश्ठा प्राप्त करण्याचा, या जगात स्वप्रस्थापन करण्याचा, सृजनशीलता वा काव्यनिर्मिती हाच कवीला सर्वोत्तम मार्ग वाटत असल्यामुळे इतरांनीही या मार्गाचे अवलंबन करावे असे कवी म्हणतो. नवनिर्मितीला जीवनात प्राधान्य देण्याची कवीची दृश्टी असल्यामुळे पारंब्यांची अनेक निर्मितीक्षम रूपेही या संग्रहात पाहावयास मिळतात. या पारंब्या कधी फांद्यांना फुटलेल्या कोंभांच्या रूपातल्या आहेत (22), कधी पेऱ्यात फुटणाऱ्या आहेत (25), तर काही दूध फुटणाऱ्या आहेत (20). सृजनशीलतेचा अभाव असणारा समाज आणि त्यातील व्यक्ती जिवंत असूनही मेल्यातच जमा असतात. या दृश्टीने 'मेलेल्या पानांशेजारी रचलेले मुडदे' (21), 'पारंब्यांसाठी धावणारं कवीचं मढं' (33), 'खड्ड्यातून मान काढणारं मढं' (24), आकाशातली चांदणी हसते, मेलेलं शरीर, स्तब्ध फांद्या पाहून (14) हे या संग्रहातील उल्लेख लक्षणीय आहेत.

आतापर्यंत पाहिलेल्या पारंब्यांच्या अनेकविध रूपांना सामाजिक संदर्भ असला आणि शोषितांच्या विश्वाचे यांच्या प्रतिमेद्वारा प्रतीकात्मक चित्रण करणे हीच कवीची प्रधान भूमिका असली तरी त्यामधूनच कवीची निर्भरशील, रोमँटिक वृत्तीही हळूच आपले डोके वर काढताना दिसते. अशावेळी या पारंब्या बाह्य विश्वातील घडामोडींपासून अलिप्त होऊन आत्मक्रीडा करू लागतात. मग या पारंब्या चांदण्यात आपली सावली विरून गेल्यावर मधुचंद्राची गोड आठवण करीत गीत गाताना दिसतात. सारे वड पुनवेच्या चांदण्यात निथळताना त्या आपली शृंगाररात साजरी करतात. लाजेनं चूर होतात. माकडांच्या लोंबकण्यात, झोके घेण्यात, उंडारण्यात, त्यांच्या धावाधावीत मूकपणे सहभागी होतात. कंदिलाच्या उजेडानं रात्री निवाऱ्याला आलेल्या पालांच्या पहाटे निघून जाण्यानं जाग्या होतात, निद्रिस्त गाढवांच्या पाठीवर लोंबकळतात. पारंब्यांची ही रूपे वैयक्तिकतेशी निगडीत असली तरी लोभस, सुखद आणि मनावर प्रसन्नतेचा शिडकावा करणारी आहेत. व्यक्तिगत जाणिवांची अभिव्यक्ती करणाऱ्या, काहीशा वर्णनपर वाटणाऱ्या पारंब्यांच्या या रूपातून शेवटी प्रेम, वात्सल्य, समर्पणशीलता आदी मूलभावनांचाच आविष्कार होताना दिसतो. या निर्भरशील, हर्शविभोर भावावस्थेमुळे कवी फुले–आंबेडकरी जाणिवेच्या केंद्रिभूत आशयापासून येथे काहीसा दूर गेल्यासारखा वाटतो. संग्रहातील एरवीचा सामाजिक सूर येथे क्षीणबल होऊन रोमॅन्टिक जाणिवा प्रबळ झाल्यासारख्या वाटतात. पण म्हणून या काव्यसंग्रहाची 'डोह'मधील ललित लेखनाशी तुलना करण्याची गरज नाही, कारण या पारंब्या सामाजिक जबाबदारी नाकारणाऱ्या नाहीत. वास्तवापासून दूर जाऊन आत्यंतिक व्यक्तिनिश्ठ होत त्या पलायनवाद स्वीकारत नाहीत; की स्वप्नरंजनात रममाण होत त्या नोस्टॅल्जिक बनत नाहीत. या संदर्भात 'रात्रीच्या अंधारात, फांदीला चिकटून मेलेली रात्रीची स्वप्ने पारंबीनं का पाहावी' असा नेमका प्रश्न कवीने केला आहे. उशःकालाची स्वप्ने पाहणाऱ्या या कवीच्या पारंब्या स्वभावतः फुले–आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू असलेल्या 'माणसाचं गाणं गाणाऱ्या (47) आहेत असे शेवटी लक्षात येते.